# मोखाडा तालुक्याच्या आदिवासी विकासासंदर्भात कृषि योजनांचे योगदान

**प्रा. जनार्दन भाऊ वारघडे**
वाणिज्य विभाग प्रमुख
कला, विज्ञान आणि वाणिज्य महा.
मोखाडा, ता.मोखाडा जि. पालघर

**प्रस्तावना :**

मोखाडा तालुका हा पालघर जिल्ह्यातील ०८ तालुक्यापैकी एक आहे. पालघर म्हटले कि जिल्ह्याचे ठिकाण पायाभूत सुविधांनी सुसज्ज़ रेल्वेने मुंबई महानगराशी जोडलेले शहर, सागरी किनारा, एक पर्यटन स्थळ अशी ओळख परिचित आहे. परंतु वर उल्लेख केलेल्या कोणत्याही बाबींशी साधा संबंध सुध्दा मोखाडयाचा येत नाही. इतर सर्व तालुक्यांपेक्षा मागास आणि दुर्लक्षित असा एक डोंगरी भाग, फक्त पालघर जिल्ह्यातील एक तालुका किंबहुना आदिवासी, मागास आणि कुपोषित तालुका असा उल्लेख मोखाड्याचा आढळतो आणि हे तितकेच खरेही आहे. या आदिवासी बहुल भागात ९९ % टक्के लोक उदरनिर्वाहासाठी शेतीवर अवलंबून आहेत शेतीतून उपजीविकेपुरते उत्पादन मिळते ज्याच्यावर शेतकऱ्याचे सर्वस्व आधारीत आहे. या आदिवासी बांधवांचा विकास होण्यासाठी मोठ्या प्रमाणात सुधारणा होणे आवश्यक आहे. आदिवासी विकास साध्य करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन शासकीय स्तरावरून विविध विभागांच्या माध्यमातून प्रयत्न होत आहेत यापैकीच एक कृषि विभाग आहे, कृषि विभागाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना देऊन शेतीच्या माध्यमातून आदिवासी विकासात हातभार लावला जात आहे. परंतु या योजना पुरेशा आहेत का? असलेल्या योजना सर्वांपर्यंत पोहचतात का? दिले जाणारे अनुदान आणि कृषी साहित्य पुरेशे आहे का? आणि सर्वात महत्वाचे शासकीय अधिकारी तेवढ्याच तळमळीने गरजूंपर्यंत त्या योजना व त्यांची माहिती पोहोचवतात का? आदिवासी विकासामध्ये कृषी योजनांचे योगदान किती ? अशा प्रश्नांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने सदर प्रकल्पाचे अध्ययन केले आहे.

**संशोधन उद्दिष्टये :**

१. मोखाडा तालुक्यातील कृषी योजनांचा अभ्यास करणे.
२. आदिवासी भागाच्या विकासामध्ये कृषिक्षेत्राचे योगदान अभ्यासणे.
३. आदिवासी विकास आणि कृषि विभागासमोरील आव्हानांचा अभ्यास करणे.

**अध्ययन पद्धती :**

या संशोधन प्रकल्पासाठी वापरलेली माहिती ही दुय्यम स्तोत्रांवर आधारित असून यामध्ये प्रकाशित लेख, वर्तमानपत्रे, मासिके आणि शासकीय संदर्भग्रंथांचा समावेश आहे. शासकीय कार्यालयांकडून उपलब्ध माहितीचा उपयोग प्रकल्पासाठी करण्यात आला आहे.

**भारतीय कृषिक्षेत्र :**

भारत हा लोकसंखेच्या बाबतीत जगातील दुसऱ्या क्रमांकांचा देश आहे. भारताची लोकसंख्या १३२ कोटी आहे तर भारतात ३९४.६ मिलीयन हेक्टर शेती उपलब्ध आहे. भारताच्या स्वातंत्र्यावेळी शेती क्षेत्र सर्वात जास्त राष्ट्रीय उत्पन्नात भागीदार होता आजमितीला शेतीक्षेत्र पिछाडीवर जाऊन सेवा क्षेत्र पुढे आलेले आहे. सेवा क्षेत्र दुसऱ्या तर शेती क्षेत्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. शासकीय स्तरावरून २.९४ लाख कोटी इतका खर्च विविध योजनांसाठी केला जातो. हा खर्च करण्यामागचा महत्वाचा उद्देश म्हणजेच जास्तीत जास्त प्रमाणात शेती वा

कृषिक्षेत्राला सहकार्य करून विकास साधणे हे होय. हेच उद्दिष्ट्ये मोखाड्यातील आदिवासींसाठी समोर ठेऊन कार्य होणे अपेक्षित आहे.

**कृषियोजनांची योगदान :**

आदिवासी भाग हा पूर्ण पणे कृषिक्षेत्रावर अवलंबून आहे. शेतीमधून येणारे उत्पन्न हेच उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन असल्याने सामाजिक विकास हा कृषिक्षेत्रावरच आधारित आहे. यास सहाय्य करण्याचे काम कृषिविभागाच्या योजना करत आहेत. विविध योजनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आदिवासी भागात कृषिपूरक साहित्य व निधी उपलब्ध करून विकास साध्य करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. यामध्ये खालील कृषियोजनांचा प्राम्युख्याने समावेश होतो.

१. **बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना:-** यामध्ये नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरिंग, पंप संच, वीज जोडणी आकार, शेततळ्यांचे प्लास्टिक अस्तरीकरण, सूक्ष्म सिंचन संच इ योजनांचा समावेश होतो.

२. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषिस्वावलंबन योजना:-** यामध्ये नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती , इनवेल बोअरिंग, पंप संच, वीज जोडणी आकार, शेततळ्यांचे प्लास्टिक अस्तरीकरण, सूक्ष्म सिंचन संच इ. योजनांचा समावेश होतो

३. **केंद्र पुरुस्कृत योजना:-** राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम अंतर्गत गोबर गॅस संयंत्र बांधणीकरिता अनुदान- अनुसूचित जमाती करिता प्रोस्ताहनपर अनुदान, अनुसूचित जाती करिता प्रोस्ताहनपर अनुदान, पूरक योगदान.

४. **जि.प. सेस फंड योजना:-** ५०% अनुदानाने नैसर्गिक आपत्तीमुळे अचानक उद्भवणाऱ्या किडरोगाचे नियंत्रण, ५०% अनुदानाने शेतकऱ्यांना सुधारित कृषिअवजारे पुरवठा, बचत गटांना शेती व्यवसायास ९०% अनुदान, ५०% अनुदानाने शेतकऱ्याना ताडपत्री पुरविणे, ७५% अनुदानाने बियाणे संच पुरवठा, फुलशेतीसाठी अर्थसहाय्य योजना, अपंग शेतकऱ्यांना ९०% अनुदानाने कृषिसाहित्य पुरावठा, बचत गटांना शेती माल विक्रीसाठी वाहतूक अर्थसहाय्य इ. योजनांच्या माध्यमातून आदिवासी विकासास हातभार लावला जात आहे.


५. **पंचायत समिती सेस फंड योजना:-** जिल्हा परिषदेप्रमाणेच पंचायत समिती कडूनही सेस फंड योजना राबविली जाते. यात प्रामुख्याने शेतकरी मेळावा, कृषी साहित्य वाटप इ. चा

**प्रमुख योजनांचे योगदान :**

| अ. क्र. | योजनेचे नाव | योजना वर्ष | | | साध्य | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० |
| १. | बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना | ४३ | ४७ | ३९ | पूर्ण | काम प्रगतीत | मंजुरी |
| २. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना | ०१ | ०४ | ०२ | पूर्ण | काम प्रगतीत | मंजुरी |

लाभ घेतलेल्या योजनांच्या चार्टवरून प्रमुख दोन योजनांची माहिती मिळते. तालुक्याची लोकसंख्या जवळपास ८५००० च्या आसपास असून, मोखाडा तालुक्यामध्ये योजनांचे लाभ घेतलेल्या लाभार्थिंची संख्या खुपच कमी असल्याची निदर्शनास येते.

VOL- VII ISSUE- III MARCH 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x




**आदिवासी शेतकऱ्यांसामोरील समस्या :**

आदिवासी शेतकऱ्यांसामोर विकासाच्या दृष्टीने विविध समस्या उभ्या असलेल्या दिसून येतात. आदिवासी विकास साध्य करत असताना अर्थव्यवस्थेसमोरील एक महत्वाचे आव्हान म्हणजे कृषिमालाचे विपणन होय. कृषिमालाला मिळणारा अयोग्य भाव, बाजारपेठांचा अभाव, मध्यस्थांची लुट सरकारची उदासीनता इ. समस्यांमुळे कृषिक्षेत्राचा हिस्सा कमी होत असल्याचा दिसतो. आदिवासी विकासामध्ये कृषिक्षेत्राची भूमिका खूप महत्वाची आहे. शासकीय पातळीवरून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांमुळे काही प्रमाणात सुधारणा होत आहे असे असले तरी आदिवासी भागाच्या विकासातील एक प्रमुख समस्या म्हणजे मुलभूत सुविधांचा अभाव याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कृषियोजना ग्रामीण भागात प्रभावशाली ठरत असताना या योजनांचा फायदा फक्त समजातील काही घटक घेताना दिसून येत आहेत. याचाच अर्थ ठराविक लोकांनाच योजनांची माहिती आहे माहिती असणारेच त्याचे फायदे घेतात. य्वरून अशा लोकपयोगी योजनांची माहिती सर्वांपर्यंत पोचवणे ही शासनाची किंबहुना शासकीय अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. सामाजिक विकास पुरेशा प्रमाणत न होण्याचे आणखी एक कारण म्हणजे योजनांचे असमान वितरण होय. अशा समस्यांमुळे आदिवासी विकास साध्य करताना विविध अडचणी येत आहेत.

**निष्कर्ष :**

१. भारतीय अर्थव्यवस्था ही जागतिक स्तरावर सातत्याने वृद्धिंगत होत असलेली अर्थव्यवस्था आहे विज्ञान आणि तंत्रज्ञानातील बदलामुळे अर्थव्यवस्थेचा झपाट्याने विकास होत असून हा विकास जागतिक पातळीवरही स्तुत्य आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागांचा मोलाचा वाटा आहे. यादृष्टीनेच आदिवासी भागात विशिष्ट योजनांची माहिती पुरविली पाहिजे

२. मोखाड्यातील आदिवासी विकासाच्या दृष्टीने कृषिक्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल करणे आवश्यक आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे मोखाडा तालुक्यातील एकूण लोकसंख्या ८५,००० हजाराच्या घरात असून पुरविण्यात येणाऱ्या सुविधा मात्र तुटपुंज्या वाटतात

३. प्रामुख्याने लोकांचा शेतीकडे बघण्याचा कल, शेतीतील सुधारित तंत्रज्ञान, शासकीय धोरणे आणि आदिवासी भागाची शैक्षणिक वाटचाल इ. कारणांमुळे कृषिक्षेत्राकडे वळणाऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

४. दुसऱ्या बाजूने आज २१ व्या शतकातही आदिवासी भागात व्यवसाय आणि उद्योगांची असलेली वाणवा कि ज्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात बेरोजगारीचा प्रश्न भेडसावत आहे. ज्याचा काही अंशी फायदा कृषिक्षेत्राला होऊन त्याचे महत्व वाढत असल्यामुळे योजनांचे योगदान वाढविणे आवश्यक आहे.

५. एकूणच आदिवासी भागाचा विकास साध्य करण्यासाठी कृषिक्षेत्राची भूमिका महत्वपूर्ण असूनत्यासाठी कृषी कार्यालयाचा विस्तार करणे गरजेचे आहे त्याकडे जाणीवपुर्वक लक्ष देण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

**संदर्भ यादी:**

1. कृषि विभाग, पंचायत समिति कार्यालय, मोखाडा.
2. जिल्हा परिषद कृषि अहवाल
3. इंटरनेट आणि शासकीय संकेतस्थळ